**DAYANAND ANGLO VEDIC PUBLIC SCHOOL, AIROLI**
**FIRST TERM SAMPLE PAPER (2024- 2025)**
**SUB: MARATHI (009)**

**STD: IX** **DURATION: 3 Hours**
**DATE:** **Maximum Marks: 80**

---

**सर्वसाधारण सूचना ः**

1) या प्रश्नपत्रिकेत - अ ,ब , क , ड - असे चार विभाग आहेत.
2) सर्व विभाग आवश्यक आहेत.
3) विभाग - अ - वाचन व आकलन - 15 गुण
4) विभाग - ब - व्याकरण - 20 गुण
5) विभाग - क - पाठ्यपुस्तक आधारित - 30 गुण
6) विभाग - ड - लेखन - 15 - गुण
7) सर्व विभागाची उत्तरे तसेच एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच लिहावीत.

---

## विभाग - अ

**प्रश्न 1) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

योगशास्त्र प्राणायम शिकवतं. प्राणायम म्हणजे आपल्या श्वासोश्वासाचे विस्तारीकरण आणि नियंत्रण. योग्य तंत्रांचा सराव केल्यास रक्तातील व मेंदूला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो. त्यामुळे प्राणशक्ती व जीवन उर्जा यांच्या नियंत्रणास मदत होते. प्राणायम आणि योगासने हे एकमेकांस पूरक आहेत. हया दोन योगतत्वांचा मिलाफ हे मन आणि शरीराचे सर्वोच्च प्रतीचे शुद्धीकरण व अनुशासन समजले जाते.या दोन विलक्षण प्रभावी गोष्टींच्या अभ्यासाने रक्तदाब , मधुमेह , थायरॉईड आणि असे अनेक आजार कितीतरी दूर पळून जाऊ शकतात.त्यासाठी फक्त सातत्य आणि सराव याची आवश्यकता आहे. आणि यात “ ध्यानाची ” भर पडली तर सर्वांगीण विकास सहज रीतीने होऊ शकतो.

सोप्या आणि समजेल अश्या शब्दात सांगायचे तर “ योगा , प्राणायम आणि ध्यान ( मेडिटेशन ) ” हे स्वतः ला निरोगी आणि प्रसन्न ठेवण्याचे पॅकेज आहे. या तीन गोष्टी अंगवळणी पडल्यास कुठलाच विकार किंवा व्याधी तुमच्या आसपास फिरकू शकत नाही.

**अ) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा.( कोणतेही तीन)** **(3 x 1 = 3)**

1) योगशास्त्र काय शिकवत ?
अ) व्यायाम ब) विस्तार क) ध्यान ड) प्राणायम

2) प्राणायम मध्ये कशाचे विस्तारीकरण होते ?
अ) हृदयाचे ब) श्वासोश्वासाचे क) ऑक्सिजनचे ड) मेंदूचे

3) स्वतः ला निरोगी आणि प्रसन्न ठेवण्याचे पॅकेज कोणते ?
अ) योगा , प्राणायम आणि ध्यान ब) हसणे क) रडणे ड) व्यायाम करणे

4) कोणत्या दोन गोष्टींमुळे अनेक आजार आपल्यापासून दूर पळून जातात ?
अ) योगासने व व्यायाम ब) प्राणायम व योगासने
क) ध्यान व प्राणायम ड) व्यायाम व प्राणायम

ब) खालील प्रश्नांची उत्तरे उता-याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही तीन) **(3 x 1 = 3)**

1) योग्य योग तंत्रांचा सराव केल्यास शरिरास कोणता फायदा होतो ?

2) प्राणायम आणि योगासने या दोन योगतत्वांचा अभ्यासाने कोणते आजार दूर पळून जातात ?

3) आजार दूर पळवून लावण्यासाठी कशाची आवश्यकता आहे ?

4) कशाची भर पडली तर सर्वांगीण विकास सहज रीतीने होऊ शकतो ?

क) उता-याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तर लिहा. ( कोणतेही एक ) **(1 x 2 = 2)**

1) आपल्या जीवनात योगशास्त्राचे महत्व थोडक्यात स्पष्ट करा.

2) स्वतः ला निरोगी आणि प्रसन्न ठेवण्याचे पॅकेज कोणते ? त्याचा काय फायदा होतो?

**प्रश्न 2) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधरित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अपयश ही यशाची पहिली पायरी असते
जीवनातल्या अनुभवांची डायरी असते

त्यातूनच प्रत्येकाचे घडत जाते भविष्य
मग कळून येते किती सूंदर आहे आयुष्य
प्रयत्नांच्या बळावर सर करता येते शिखर
लाथ मारेन तिथे पाणी काढेन ही ठेवा जिगर
कुठल्या समस्येला नाही आत्महत्या हा पर्याय
सदा पुढेच जायचे संकटावर ठेवून पाय
नापास होणं म्हणजे नाही आभाळ कोसळण
जीवन म्हणजे असत निरंतर शिकणं
परीक्षा नाही ठरवू शकत आयुष्याचे मोल
अंगी बाणवावी कला अन् सावरावा तोल
दुर्गम कडा भेदण्याची ठेवा दुर्दम्य अभिलाषा
मग येणारच नाही तुमच्याजवळ निराशा

अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या त्तरांचा योग्य पर्याय निवडा. ( कोणतेही तीन) **(3 x 1 = 3)**

1) अपयशाला कवीने कशाची उपमा दिली आहे ?

अ) आयुष्याची ब) अनुभवांची डायरीची क) पायरीची ड) भविष्याची

2) 'आभाळ कोसळणे ' वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

अ) पाऊस पडणे ब) विजा चमकणे क) अपयशी ठरणे ड) संकट येणे

3) ' सतत 'या अर्थाचा कवितेत आलेला शब्द कोणता ?

अ) सर करणे ब) निरंतर क) मोल ड) दुर्गम

4) कवीने सर्वांना आयुष्याचा तोल सावरण्यासाठी काय करण्याचा सल्ला दिला आहे ?

अ) ठाम उभे राहण्याचा ब) मेहनत करण्याचा

क) एखादी कला अंगी जोपासण्याचा ड) अभ्यास करण्याचा

ब) कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार) **(4 x 1 = 4)**

1) कवीने सर्वांना कोणती जिगर ठेवण्याचे आवाहन केले आहे ?

2) कोणत्याही समस्येला जीवनात कोणता पर्याय कधीच असत नाही ?

3) आपल्या जवळ कधीही निराशा येऊ नये म्हणून माणसाने काय करावे ?

4) कशाच्या मदतीने शिखर सर करता येते ?

5) ' इच्छा ' या अर्थाचा कवितेत आलेला शब्द कोणता ?

## विभाग - ब

प्रश्न 3 अ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही चार ) **(4 x 1 = 4)**

1) वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा .
तिच्याकडे असलेले भाषिक ज्ञान कुणाकडेही नव्हते.
अ) नाम ब) क्रियापद क) सर्वनाम ड) विशेषण

2) खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय लिहा.
एडिसनने हे आव्हान स्वीकारले खरे , ........... हे काम सोपे नव्हते.
होते. ( आणि , म्हणून , किंवा , पण )

3) नाना गेले , त्या दिवशी मी ठरवले आजपासून संगीत बंद. ( वाक्यातील सर्वनाम ओळखा )
( नाना , संगीत , मी , ठरवले )

4) खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते ?
अ) अबब ! केवढी मोठी इमारत ही !
ब) छे ! मी असे म्हटलेच नाही.
क) आम्ही नियमीत व्यायाम करणार.
ड) अरेरे ! धावताना पडला तो.

5) खालीलपैकी योग्य विधान कोणते.
अ) विशेषण म्हणजे कियापदाविषयी माहिती सांगणारा शब्द होय.
ब) विशेषण म्हणजे कोणत्याही वस्तूला दिलेले नाव होय.
क) विशेषण म्हणजे नामावद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द होय.
ड) विशेषण म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द होय.

ब) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही तीन) **(3 x 1 = 3)**

1) या सामन्यांत निरनिराळया एकवीस खेळांची तरतूद आहे. ( वाक्याचा काळ ओळखा)

2) अशात सातवा घोरपडयाचा पोरगा वावगं वागला . ( भविष्यकाळातील वाक्य तयार करा)

3) रस्ता एकेरीचा होता. ( वाक्याचा काळ ओळखा )

4) मला सखू आजी नेहमीच एक कविता वाटते. ( भूतकाळातील वाक्य तयार करा )

क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही तीन) **(3 x 1 = 3)**

1) तू काठे राहतोस ?( विधानार्थी वाक्य बनवा)

2) किती मनोरम दृष्य हे ! ( वाक्याचा प्रकार ओळखा )
3) दररोज व्यायाम करावा.( आज्ञार्थी वाक्य बनवा )
4) समीर दररोज शाळेत जातो. ( वाक्याचा प्रकार ओळखा )

ड) **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** **(2 x 1 = 2)**

1) खालीलपैकी निश्चितपणे अनेकवचनी शब्द कोणता ते ओळखा.
अ) स्नायू ब) डबे क) रंग ड) ध्वज
2) कार्बनचा तुकडा जोडून प्रकाश तयार करण्याचे काम खर्चीक होते.
( अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा )
3) ‘ सही ’ या शब्दाच्या अनेकवचनाचा शब्द लिहा.

प्रश्न 4 अ) **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** **(2 x 1 = 2)**

1) खालीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.
अ) स्त्री ब) आजोबा क) विदयार्थीनी ड) कन्या
2) लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.
अ) आवार ब) कळस क) खांब ड) पडदा
3) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता.
अ) दादा ब) बाबा क) मालक ड) शेतकरीण

ब) **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** **(2 x 1 = 2)**

1) खालीलपैकी समानार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती.
अ) विदयालय - शाळा ब) खिन्न - आनंदी क) पाऊस - वारा ड) दिवस - रात्र

2) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?
अ) वैरी ब) शत्रू क) मित्र ड) दुष्मन

3) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?
अ) अग्नी ब) आग क) वन्ही ड) वारा

क) **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** **(2 x 1 = 2)**

1 ) खालीलपैकी विरूद्धार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती?
अ) सजीव - जीवीत ब) मृत - अमुर्त क) अल्पकाळ - दीर्घकाळ ड) सशक्त - निरोगी

2) ‘ जमा ’ या शब्दाचा विरूद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.
अ) खर्च ब) काटकसर क) बचत ड) यापैकी नाही

3) ‘ जड ’ या शब्दाचा विरूद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.
अ) अवजड ब) कमी वजनाचे क) अतिशय जड ड) हलके

ड) **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** **(2 x 1 = 2)**

1) खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता ?
अ) आमरण ब ) यथाशक्ती क) हरसाल ड) चहापाणी

२) पुढील वाक्यांतील अधारेखित सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

1) आई गावाहून चार-पाच दिवसात येईल.

2) मी प्रतिदिन शाळेत जातो.

## विभाग - क

प्रश्न 5 अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही तीन) **(3 x 1 = 3)**

1) किती वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली ?

2) गावचा सरपंच कसा होता ?

3) एडिसनने कुठे प्रचंड मोठा मंडप उभारला ?

4) ऑलिंपिक सामने किती वर्षांनी होतात ?

5) लेखकाला कशाचा राग आला ?

ब) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा ( कोणतेही तीन)**(3 x 1 = 3)**

1) आजीची ............ कधी कधी आठवडा आठवडा चालायची .

अ) गंमत ब) गाणी क) करामत ड) गोष्ट

2) ............ तयार केलेली फिलॅमेंट ही अधिक काळ प्रकाश देणारी ठरली.

अ) बांबूपासून ब) सागापासून क) पळसापासून ड) झाडांपासून

3) भारताने ............ स्पर्धेत अनेक वर्षे अजिंक्यपद टिकवले.

अ) कबड्डीच्या ब) नेमबाजीच्या क) हॉकीच्या ड) धावण्याच्या

4) एक अक्षर न बोलता नाना ............ बसले.

अ) खुर्चीवर ब) टेबलावर क) बिछान्यावर ड) आरामखुर्चीवर

5) भारतात सर्वात पहिली रेल्वे ............ येथून सुटली.

अ) ठाणे ब) कर्जत क) मुंबई ड) पुणे

क) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे 40 ते 50 शब्दांत उत्तर लिहा. ( कोणतेही एक ) **(1 x 3 = 3)**

1) ऑलिंपिक स्पर्धांचा तुम्हाला जाणवणारा महत्त्वाचा गुण सांगा आणि त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

2) ' रेल्वेचा शोध देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारा ठरला.' तुमचे मत लिहा.

3) शिरिषच्या आत्मविश्वासाबद्दल तुमचे मत लिहा.

ड) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमाधील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा.**(5x 1=5)**

( दवंडी पिटणे , वावगे वागणे , पोरके होणे , पर्वणी असणे , टेकीला येणे , रवाना होणे )

1) ऑलिंपिक सामने म्हणजे क्रीडाशौकीनांसाठी एक अत्यंत आनंदाची गोष्ट असते.

2) आईबाबा अपघातात गेल्यामुळे राजू अनाथ झाला.

3) कधीही कुणी चुकीचे वागू नये.

4) ग्रामसभा घेण्यासाठी सरपंचांनी गावात जाहीर केले.

5) राजूच्या खोडया पाहून आई अगदी हैराण झाली.

**प्रश्न 6अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही चार)** **(4 x 1 = 4)**

1) कोणते सूत्र ध्यानी ठेवावे असे कवी म्हणतो ?
2) संत बहिणाबाईंनी वारकरी संप्रदायाच्या प्रचारासाठी स्विकारलेले कार्य कोणते?
3) संत जनार्दन व संत एकनाथ यांनी वारकरी संप्रदायाला काय दिले ?
4) वारकरी संप्रदायावर कळस कोणी चढवला ?
5) सर्वप्रकारे , सर्व ठिकाणी कोणाला वैरी मानावे असे कवी म्हणतो ?
6) व्यायामामुळे शरीरातील रक्तव्यवस्था कशी होते ?

**ब) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही चार)** **(4 x 1 = 4)**

1) संतकृपा झाली । इमारत ........... आली ।।
( मुळा , कळा , फळा , माळा )
2) व्यायामे जडत्व जाई दूरी । व्यायामे अंगी राहे .........।
( ताजेपणा , तरतरी , दुबळेपणा , आळस )
3) व्यायामहीना पित्त , ........... , वायु जर्जर करिती अत्यंत ।।
( सर्दी , पडसे , ज्वर , कफ )
4) .............. रचिला पाया । उभारिलें देवालया ।।
( जनार्दनें , नामा , ज्ञानदेवें , एकनाथ )
5) बहिणी म्हणे फडकती ........... निरूपणा केलें बोजा।
( पताका , ध्वजा , झेंडा , निशाणा )

**क) खालील काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ( कोणतेही एक)** **(1 x 3 = 3)**

1) ‘ व्यायामाविण सात्विक भोजन । तेहि मारी विकारी होऊन ।
2) ‘ तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।’

**प्रश्न 7अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही तीन)** **(1 x 3 = 3)**

1) व्हेनिसमध्ये कोणता कालवा आहे ?
2) व्हेनीस शहराला कशाचा पुंजका म्हटले आहे ?
3) प्रवाशांची ने - आण करण्यासाठी कोणती साधने आहेत ?
4) ग्रॅड कॅनॉलच्या किना-यावर प्रवाशांसाठी कोणती व्यवस्था केली आहे ?
5) लेखकाला व्हेनिस शहराचे वातावरण कसे वाटले ?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे 40 ते 50 शब्दांत उत्तर लिहा. ( कोणतेही एक )** **(1 x 2 = 2)**

1) टिपा लिहा.
अ) ग्रॅड कॅनॉल
ब) व्हेनिसचा स्टेशनबाहेरचा परिसर

## विभाग - ड

प्रश्न 8 अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 - 250 शब्दांत निबंध लिहा. **(1 x 6 = 6)**

1) सूर्य उगवला नाही तर ...... -

मुद्दे ः सूर्य प्रकाशाचा स्त्रोत - अनेक कामे सूर्यप्रकाशामुळे सुकर - लोकांना उर्जा मिळते - पण तो उगवला नाही तर काय घडेल ? - दिवसरात्र अंधार - लोकांना आरामच आराम - अनेक कामात अडथळे - कारणे - परिणाम .

2) मी पाहिलेला किकेटचा सामना -

मुद्दे ः एक महत्वाचा खेळ - सामना कधी , केव्हा झाला ? एका संघात किती खेळाडू - खेळाडूंचे कौशल्य - सामन्याचा शेवट.

3) शेतक-याचे आत्मकथन -

मुद्दे ः नाव - गाव - शिक्षण - शेतीच्या कामाची सवय - दिवसभर शेतात राबणे - रेडिओ - दूरदर्शनवरील माहितीचा उपयोग - शेती करायला तयार नाही - काही अपेक्षा.

ब) दिलेल्या मुददयांच्या आधारे कथा लिहा. शीर्षक दया व तात्पर्य लिहा. ( कोणतेही एक ) **(1 x 5 = 5)**

1) मुद्दे ः एक गरीब मुलगा - शाळेची फी भरण्यास पैसे नसणे - सकाळी पेपर टाकण्याचे काम - वाटेत पैशाचे पाकीट मिळणे - प्रामाणिकपणे पोलीस स्टेशनवर नेऊन देणे - पाकिटाच्या मालकास आनंद - बक्षीस.

किंवा

मुद्दे ः दोन मित्र - सागरातून प्रवास - वादळ , वारे - नावेचे तुकडे - तुकडे - एका फळीचा आधार - माझ्या आईला सांभाळ - पहिल्या मित्राची विणवणी - दुस-या मित्राचे समजावणे - पहिल्या मित्राचे फळी सोडणे - दुसरा मित्र वाचणे - तात्पर्य.

क) खालील विषयावर पत्र लिहा. ( लिफाफा आवश्यक ) ( कोणतेही एक ) **(4 x 1 = 4)**

1) अमन / अमिता साने राहणार पनवेल नवी मुंबई , येथून रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणा-या व्यत्ययाबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.

किंवा

अक्षय / अक्षया देशपांडे , पाटली पाडा , डोंबिवली. येथून आपल्या शाळेच्या कीडा विभागासाठी आवश्यक साहित्याची मागणी करणारे पत्र विदयार्थी प्रतिनिधी या नात्याने लिहा.

************************